




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक ५ • शानिवार, दि. ११ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com







# महाराष्ट्रावर 28 हजार कोटींच्या कर्जाचा डोंगर!

## महसुली तूट वाढली; कॅगचा गंभीर इशारा

## कर्जाची रक्कम वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी ११ जुलै

**मुंबई :** देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी (कॅग) राज्याच्या आर्थिक पारदर्शकतेवर गंभीर आक्षेप नोंदवितानाच २०२४-२५ या आर्थिक वर्षअखेर राज्याचे अर्थसंकल्पबाह्य कर्ज २८ हजार ३२५ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे ताशेरे ओढले आहेत. ही कोट्यवधी रुपयांची देणी राज्याच्या अधिकृत अर्थसंकल्पी कागदपत्रांमध्ये न दाखविल्याने राज्यावरील एकूण कर्जाचा बोजा कमी दिसतो. विधिमंडळाच्या अपरोक्ष हे करण्यात आले असल्याचा आक्षेपदेखील नोंदविण्यात आला आहे.

महसूल तुटीमध्ये वाढ, बांधील खर्चाचे वाढते ओझे या राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतच्या अन्य गंभीर बाबींकडेही या अहवालामध्ये लक्ष वेधले आहे. राज्याने वित्तीय तूट कायद्यातील 'जीएसडीपी'च्या २.७४ टक्के मर्यादित ठेवली असली तरी महसुली तूट २९




हजार ९९४.७६ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. याचा अर्थ राज्य दीर्घकालीन विकासात्मक मालमत्ता निर्माण करण्याऐवजी दैनंदिन प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी कर्जावर अधिक अवलंबून राहत असल्याचे स्पष्ट होते. राज्याचे सकल उत्पन्न (जीएसडीपी) ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये इतके गृहीत धरल्यास एकूण देयके 'जीएसडीपी'च्या १९.५८ टक्के इतकी आहेत. अशा प्रकारे अर्थसंकल्पाबाहेरील कर्जउभारणीमुळे आर्थिक पारदर्शकता, उत्तरदायित्वाबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात.

### निधी बँकांत ठेवण्यास आक्षेप

» राज्याच्या एकूण महसुलाच्या ६३.४५ टक्के रक्कम ही वेतन, निवृत्तिवेतन, व्याज देयके आणि अनुदाने अशा बांधील खर्चावर खर्च होत आहे. याशिवाय सरकारच्या विविध प्रकारच्या बँक खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खर्च न झालेला निधी ठेवण्याच्या पद्धतीवरही लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतला आहे.

» वित्त विभागाच्या अटींनुसार या कर्जावरील मूळ रक्कम आणि व्याजाची परतफेड करण्यासाठी राज्य सरकारने दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद करणे बंधनकारक आहे. त्यामुळे ही अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे राज्याच्या तिजोरीवर थेट भार टाकत असतात. 'महाराष्ट्र वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम- २००५' नुसार राज्याच्या एकूण देयकांमध्ये एकत्रित निधी आणि सार्वजनिक खाते यांतील कर्जांचा समावेश असणे आवश्यक आहे. मात्र, अर्थसंकल्पाबाहेरील या कर्जांचा समावेश न केल्यामुळे खरे चित्र दिसत नाही. राज्यावरील सार्वजनिक कर्ज आणि इतर देयके ८ लाख ५९ हजार ०९७ कोटी रुपये एवढी होती. मात्र, अर्थसंकल्पावरील कर्जाचा समावेश केल्यास राज्याची प्रत्यक्ष देणी ८ लाख ८७ हजार ४२२ कोटी रुपयांवर जाऊ शकतात.

## डॉ. अभय पाटील यांना मातृशोक



अकोला: स्व. डॉ.के.एस. पाटील यांच्या पत्नी तसेच अस्थीरोगतज्ञ डॉ.अभयदादा पाटील यांच्या मातोश्री कमलाबाई पाटील यांचे आज सकाळी वृद्धापकाळाने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी आज ११ रोजी सायंकाळी ५ वाजता मोहता मिल अकोला स्मशानभूमी येथे करण्यात येईल.

## » थोडक्यात

### जामिनावर सुटलेल्या आरोपीने कुटुंबासह 6 जणांना संपवले!

रंगारेड्डी : तेलंगणाच्या रंगारेड्डी जिल्ह्यात जामिनावर बाहेर असलेल्या व्यक्तीने शुक्रवारी रात्री बायको-मुलांसह सहा जणांची हत्या केली. ३५ वर्षीय या व्यक्तीने स्वतःच्या पत्नी व दोन मुलांसह पाठलाग केला म्हणून तक्रार करणाऱ्या १६ वर्षीय मुलीसह तिच्या आई आणि आजीचा देखील खून केला. १६ वर्षीय मुलीचा पाठलाग केल्याचा आरोप त्याच्यावर असून, त्याला अटकपूर्व जामीन मंजूर झाल्यानंतर गेल्या महिन्यात वैयक्तिक हमीपत्रावर त्याला जामीन मिळाला होता. हैद्राबादपासून जवळच्या अंतरावरच असणाऱ्या आरोपीच्या मूळ गावातच शुक्रवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

---

### विधान परिषदेचे पाच सदस्य निवृत्त !

मुंबई: विधान परिषद सदस्यत्वाची सहा वर्षाची मुदत पूर्ण झाल्याने सभागृहात पाच सदस्यांना निरोप देण्यात आला. पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवृत्त होणाऱ्यांमध्ये सतीश चव्हाण, अरुण लाड, (राष्ट्रवादी) अभिजित वंजारी (काँग्रेस), किरण सरनाईकआणि जयंत आसगावकर (काँग्रेस) या पाच सदस्यांना समावेश आहे. विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असून समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना लोकशाही आणि प्रशासकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

## शिवसेनेचे संपर्कप्रमुख नाशिकला रवाना

# 'ऑपरेशन टायगर'च्या वावड्या उठताच उद्धव ठाकरे ॲक्शन मोडवर!

प्रतिनिधी ११ जुलै

नाशिक : महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या 'ऑपरेशन टायगर'चे जोरदार हादरे आता नाशिकमध्ये बसू लागले आहेत. नाशिक महानगरपालिकेतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १० ते १२ नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या गळाला लागल्याच्या वावड्या उठल्या आहेत. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर हे तातडीने नाशिकमध्ये दाखल झाले असून, आज त्यांनी पदाधिकारी आणि नगरसेवकांची अत्यंत महत्त्वाची आढावा बैठक बोलावली आहे. या हाय-व्होल्टेज घडामोडींमुळे नाशिकच्या राजकारणात प्रचंड सस्पेन्स निर्माण झाला आहे.

या सर्व प्रकरणाला तेव्हा गंभीर वळण मिळाले, जेव्हा ठाकरेंच्या शिवसेनेचे गटनेते केशव पोरजे यांनी पत्रकार परिषदेत एक खळबळजनक आरोप केला. पोरजे यांच्या दाव्यानुसार, 'उपमहापौरपदाचा सौदा करू पाहणारे काही एजंट आमच्या नगरसेवकांना ५ कोटी रुपयांच्या प्रभाग निधीचे आमिष दाखवून फोडण्याचा प्रयत्न करत आहेत.' यामध्ये एका वकिलाचा समावेश असून, ज्याला स्वतःला स्वीकृत नगरसेवक व्हायचे आहे, तोच ५ ते ६ नगरसेवकांच्या संपर्कात असल्याचा दावा त्यांनी केला.

### 13 नगरसेवक प्रत्यक्ष हजर, 2 जण अनुपस्थित

» नाशिक मनपामध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे एकूण १५ नगरसेवक आहेत. या शक्तिप्रदर्शनादरम्यान १३ नगरसेवक प्रत्यक्ष हजर होते. तर नगरसेविका मंगला आढाव आणि मुरलीधर भामरे हे दोघे कौटुंबिक दुःखद कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, भामरे यांच्या मुलाने हजेरी लावून पक्षप्रमुखांसोबत असलेली निष्ठा जाहीर केली.

### 'ऑपरेशन तुडवा'चा थेट इशारा

» या पक्षांतराच्या चर्चांवर पडदा टाकण्यासाठी ठाकरेंच्या नगरसेवकांनी एकत्र येत पत्रकार परिषद घेतली आणि आपली वज्रमूठ दाखवली. 'आमचा एकही नगरसेवक फुटणार नाही, आम्ही सर्वजण निष्ठावंत आहोत,' असा दावा करत, 'ज्याप्रमाणे खासदार फुटले तेव्हा 'ऑपरेशन तुडवा' राबवण्यात आले, तसेच आता 'ऑपरेशन तुडवा' राबविणार,' असा थेट इशारा गटनेत्यांनी विरोधकांना दिला आहे.



## उद्धव ठाकरेंचे 18 जुलैला रामरक्षा आंदोलन

प्रतिनिधी ११ जुलै

मुंबई : मुंबईत रामरक्षा आंदोलन केल्यानंतर आता नागपुरात आंदोलन शिवसेना ठाकरे पक्षाकडून करण्यात येणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेनेने रामरक्षा आंदोलन जे सुरू केले त्याचा पहिला टप्पा मुंबईत पार पडला. दुसरा टप्पा महाराष्ट्राच्या उपराजधानीमध्ये १८ तारखेला साडेचार वाजता होईल. स्वतः शिवसेना पक्षप्रमुख, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आणि असंख्य आमचे मुंबईतले नेते व विदर्भातले कार्यकर्ते यात सहभागी होतील, असे राऊत म्हणाले.

संजय राऊत म्हणाले, १८ जुलैला शिवसेना पक्षप्रमुख नागपूरला रामरक्षा आंदोलनात सहभागी होतील. राम मंदिर लूट प्रकरणामध्ये देशात असंतोष आहे, आजही मुख्य आरोपी पकडले गेले नाहीत, आजही लूट सुरू आहे.

# हिंगोली जिल्ह्याला पुन्हा भूकंपाचा धक्का!

## औंढा नागनाथ तालुक्यातील वसईत केंद्रबिंदू

प्रतिनिधी ११ जुलै

**हिंगोली :** जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला आहे. आज ११ जुलैला सकाळी ११.२६ वाजण्याच्या सुमारास जिल्ह्याला भूकंपाचे हादरे जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू औंढा नागनाथ तालुक्यातील 'वसई' येथे असून, त्याची खोली ५ किलोमीटर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत आहेत. वसमत तालुक्यातील 'पांगरा शिंदे' येथे गेल्या आठ वर्षांपासून भूकंपाचे धक्के बसत असून, या धक्क्यांमुळे गावकरी दहशतीखाली आहेत. याआधी ८ जुलै रोजी मध्यरात्री जिल्हाभरात भूकंपाचे चार मोठे धक्के जाणवले होते, त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या चारही भूकंपांचा केंद्रबिंदू वसमत तालुक्यातील 'पांगरा शिंदे' आणि औंढा नागनाथ तालुक्यातील 'काकडधाबा' परिसरात होता. विशेष म्हणजे, मागील काही वर्षांतील सर्वात मोठा ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप ८ जुलैला नोंदवला गेला होता.

जिल्ह्यातील नागरिक आधीच्या धक्क्यांतून सावरत नाहीत तोच शनिवारी सकाळी ३.५ रिश्टर स्केलच्या तीव्रतेचा भूकंप झाला. पांगरा शिंदे, काकडधाबा आणि आता वसई येथे केंद्रबिंदू नोंदवल्या गेल्याने, भूकंपाचा केंद्रबिंदू हळूहळू सरकत असल्याची भीती जिल्हावासियांमध्ये निर्माण झाली आहे. दरम्यान, शनिवारी झालेल्या या भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## एकनाथ खडसे थेट मातोश्रीवर!

**मुंबई :** भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या निवासस्थानी भेट दिल्यानंतर त्यांच्या भाजपमध्ये घरवापसी होण्याच्या चर्चांना मोठे उधाण आले होते. मात्र, या चर्चांदरम्यानच खडसे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी भेट घेतल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, या भेटीदरम्यान खासदार संजय राऊत हेही उपस्थित होते. त्यामुळे खडसे यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत विविध तर्क-वितर्क रंगू लागले आहेत.

# महाराष्ट्रातील ६३ लाख शेतकऱ्यांना ऐतिहासिक कर्जमाफी !

› अकोला पुर्वचे आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रयत्नांना यश

› शेतकरी कर्जमाफीमध्ये आ.सावरकरांचे मोठे योगदान आले समोर

प्रतिनिधी ११ जुलै

**अकोला:** शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे अस र्जमुक्ती योजने'चा लाभ आता राज्यातील तब्बल ६३ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील आमदारांनी केलेल्या आग्रही मागणीला अखेर मुख्यमंत्र्यांनी हिरवा कंदील दाखवला आहे.

पावसाळी अधिवेशन २०२६ दरम्यान, भाजपचे माजी सरचिटणीस आणि विधिमंडळ प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांकडे शेतकऱ्यांनाच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले होते. यामध्ये प्रामुख्याने सन २०१९ च्या महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजनेतील शेतकऱ्यांचा मुद्दा लावून धरण्यात आला होता.



२०१९ च्या योजनेतील १३ लाख थकबाकीदार शेतकऱ्यांना आधी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ मिळणार होता.

मात्र, आमदार सावरकरांच्या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांनी ही मर्यादा वाढवून २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत आधीच ५० लाख शेतकऱ्यांना लाभ मिळत होता. आता या नवीन घोषणेमुळे एकूण ६३ लाख शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. सन २०२५-२६ आणि २०२६-२७ मधील पीक कर्जाच्या परतफेडीची अट देखील शासनाने शिथिल केली आहे, ज्यामुळे दुष्काळ आणि अतिवृष्टीने होरपळलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २३ जून २०२६ रोजी सत्तारूढ पक्षाकडून मांडण्यात आलेल्या २९३ च्या प्रस्तावावर बोलताना आमदार रणधीर सावरकर यांनी शेतकरी, त्यांच्या व्यथा, विदर्भ-मराठवाड्यातील अवर्षण आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेली अतिवृष्टी यावर सभागृहात प्रखर आवाज उठवला होता.

'अल निनो'च्या प्रभावामुळे पेरण्या रखडल्याची वस्तुस्थिती त्यांनी शासनासमोर मांडली होती. त्यांच्या याच अभ्यासू नेतृत्वाची दखल घेत महायुती सरकारने हा निर्णय घेतला.